मागणी क्र.सी-७, प्रधान शीर्ष २४१५- कृषी विषयक संशोधन व शिक्षण, २७७, शिक्षण (००) (००) (०१) वन अधिकारी व क्षेत्रपाल यांचे प्रशिक्षण (२४१५ ०४८२) अनिवार्य योजनेतील २०- इतर प्रशासकीय खर्च या उद्दीष्टांतर्गत निधी वितरीत करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय क्रमांक : एफडीएम-२०२६/प्र.क्र.६२/फ-२
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक :- २८ जुलै, २०२६.

वाचा : १. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र. असं./योजनेत्तर/कक्ष-२(१)/प्र.क्र.०१(भाग-१)/९६/२०२६-२७, दि.११.०६.२०२६.
२. उप वनसंरक्षक (शिक्षण व प्रशिक्षण), पुणे यांचे पत्र क्र. कक्ष-३/प्र.क्र.०१/योजनेतर/२०३/२६-२७, दि.१०.०६.२०२६.
३. वित्त विभाग, शासन परिपत्रक, क्र.अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३, दि.०९.०४.२०२६.

प्रस्तावना :-

प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांच्या दि.११.०६.२०२६ रोजीच्या आणि उप वनसंरक्षक (शिक्षण व प्रशिक्षण), पुणे यांच्या दि.१०.०६.२०२६ रोजीच्या पत्रान्वये विनंती केल्यानुसार, सन २०२६-२७ करिता मागणी क्र.सी-७, प्रधान शीर्ष २४१५- कृषी विषयक संशोधन व शिक्षण, २७७, शिक्षण (००) (००) (०१) वन अधिकारी व क्षेत्रपाल यांचे प्रशिक्षण (२४१५ ०४८२) अनिवार्य योजनेतील २०- इतर प्रशासकीय खर्च या उद्दीष्टांतर्गत प्रशिक्षणाकरीता अनुदान उपलब्ध करुन देणेबाबतचा प्रस्ताव सादर केला आहे.

त्या अनुषंगाने “२४१५ ०४८२” या लेखाशिर्षातील “२०- इतर प्रशासकीय खर्च” अंतर्गत निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

त्याअनुषंगाने प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचा प्रस्ताव तसेच वित्त विभागाने मान्यता दिल्यानुसार व बीम्स् (BEAMS) प्रणालीवर उपलब्ध करुन दिलेले अनुदान विचारात घेता, सन २०२६-२७ करिता मागणी क्र.सी-७, प्रधान शीर्ष २४१५- कृषी विषयक संशोधन व शिक्षण, २७७, शिक्षण (००) (००) (०१) वन अधिकारी व क्षेत्रपाल यांचे प्रशिक्षण (२४१५ ०४८२) अनिवार्य योजनेतील २०- इतर प्रशासकीय खर्च या उद्दीष्टांतर्गत एकूण मंजूर अर्थसंकल्पित अर्थसंकल्पित रक्कम रु.५.०० कोटी निधीच्या ६०% च्या मर्यादेत **रु.३.०० कोटी (तीन कोटी फक्त)** इतका निधी **वितरीत** करण्यास खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे :-

१) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी सदर निधी या विभागाकडून मंजूर केलेल्या प्रस्तावातील क्षेत्र / कार्यक्रम / कामे यावरच खर्च होईल व कामाची द्विरुक्ती होणार नाही आणि मंजूर कामांव्यतिरिक्त कोणत्याही नवीन बाबीवर /नवीन क्षेत्रावर/ नवीन कामांवर खर्च करण्यात येणार नाही, याची दक्षता घ्यावी.

२) सदरहू निधी वितरित करण्यापूर्वी प्रस्तावानुसार योजनेतील निश्चित केलेल्या कामांना सक्षम अधिकायांची- तांत्रिक व प्रशासकीय मंजूरी असल्याची व त्याचबरोबर सध्या वाटप करण्यात येणाऱ्या अनुदानातून खर्च करताना यामध्ये कोणतीही वित्तिय अनियमितता होणार नाही, याची दक्षता घ्यावी.

३) सदर योजनेकरिता वितरित केलेला निधी खर्ची पडल्यानंतर त्याचे उपयोगिता प्रमाणपत्र शासनास तसेच महालेखापाल कार्यालयास सादर करावे.

४) त्याचप्रमाणे वित्त विभागाच्या दि.०९.०४.२०२६ रोजीच्या शासन परिपत्रकातील तसेच वेळोवेळी निर्गमित अटी व शर्तींची पूर्तता करण्यात येईल, याची देखिल दक्षता घ्यावी.

५) सदर प्रस्तावांतर्गत करावयाच्या कामाचा खर्च मागणी क्र.सी-७, प्रधान शीर्ष २४१५- कृषी विषयक संशोधन व शिक्षण, २७७, शिक्षण (००) (००) (०१) वन अधिकारी व क्षेत्रपाल यांचे प्रशिक्षण (२४१५ ०४८२) अनिवार्य योजनेतील २०- इतर प्रशासकीय खर्च या उद्दीष्टांतर्गत वन अधिकारी व क्षेत्रपाल यांचे प्रशिक्षणाकरीता सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात उपलब्ध करुन देण्यात आलेल्या अनुदानामधून भागविण्यात यावा.

२. सदर शासन निर्णय, वित्त विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्र. ५१५/२०२६/व्यय-१०, दि.०१.०७.२०२६ अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०७२८१७४६२४५९४० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by SHILPA ABHAY CHACHAD
Date: 2026.07.28 17:48:36 +05'30'

(शिल्पा चाचड)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत :-

१) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.

२) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), म.रा.नागपूर.

३) प्रधान मुख्य वनसंरक्षक (सर्व) आणि अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (सर्व).

४) मुख्य वनसंरक्षक (सर्व).

५) महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता/ लेखा परीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.

६) जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व).

७) वित्त विभाग, व्यय-१० कार्यासन मंत्रालय, मुंबई.

८) नियोजन विभाग (का-१४७५), मंत्रालय, मुंबई.

९) मा.मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

१०) मा.मंत्री (वने) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

११) ब-१ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.

१२) निवडनस्ती, फ-२ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.